
दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ

# माझ्या यशात विवेकानंद कॉलेजचा सिंहाचा वाटा - हर्षवर्धन पाटील

## परीक्षेत ३४९ वा क्रमांक; कोल्हापुरात सत्कार सोहळा उत्साहात



कोल्हापूर प्रतिनिधी :
दैनिक महाभारत

जिद्द, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर यश मिळविता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण ठरलेला विवेकानंद कॉलेजचा माजी विद्यार्थी हर्षवर्धन पाटील याने केंद्रीय लोकसेवा आयोग (णझडउ) परीक्षेत ३४९ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांच्या वतीने त्याचा भव्य सत्कार करण्यात आला.

विवेकानंद कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यापासूनच संघर्षाची सवय लागते. येथील शैक्षणिक वातावरण, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि उपलब्ध सुविधा यामुळेच मला यश मिळविता आले. माझ्या यशात विवेकानंद कॉलेजचा सिंहाचा वाटा आहे, असे मनोगत हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. त्यांनी आपल्या भाषणात णझडउ ही देशातील अत्यंत कठीण व प्रतिष्ठेची परीक्षा असल्याचे सांगत, या परीक्षेत यश मिळविण्यासाठी बुद्धिमत्ता सोबतच दृढ निश्चय, स्वयंशिस्त आणि अथक परिश्रम आवश्यक असतात. हर्षवर्धनने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळविलेले यश निश्चितच प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार काढले. तसेच शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा अंगीकार करून हर्षवर्धनने प्रशासकीय सेवेत आपली छाप उमटवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी हर्षवर्धनचे वडील प्रा. हरिश्चंद्र पाटील यांनी आपल्या मुलाच्या शैक्षणिक प्रवासाचा आढावा घेतला. हर्षवर्धनचे माध्यमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे, तर उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे पूर्ण झाले आहे.

कार्यक्रमात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन हर्षवर्धन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हर्षवर्धन पाटील याच्या यशामुळे विवेकानंद कॉलेज व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक परंपरेला आणखी एक मानाचा तुरा मिळाला असून, विद्यार्थ्यांमध्ये नवी प्रेरणा निर्माण झाली आहे.